# कार्यावली

## गुरुवार, दिनांक ३ मार्च, २०२२ रोजी सकाळी ११-०० वाजता मुंबई येथील विधान भवनात सुरू होणाऱ्या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२२ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनाची कार्यावली.

| | | |
|---|---|---|
| **एक** | : | राज्यपालांचे अभिभाषण. |
| **दोन** | : | राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत सभागृहासमोर ठेवणे. |
| **तीन** | : | राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव. |
| **चार** | : | सभापतींनी, सभापती-तालिका नामनिर्देशित करणे. |
| **पाच** | : | प्रश्नोत्तरे. |
| **सहा** | : | अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे. |
| **सात** | : | राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा. |
| **आठ** | : | सन २०२२-२०२३ चा अर्थसंकल्प सादर करणे व त्यावर सर्वसाधारण चर्चा करणे. |
| **नऊ** | : | सन २०२१-२०२२ च्या पुरवणी मागण्या सादर करणे व त्यावर चर्चा करणे. |
| **दहा** | : | अनुसूचित जाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे. |
| **अकरा** | : | पंचायती राज समितीचे अहवाल सादर करणे. |
| **बारा** | : | रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे. |
| **तेरा** | : | अनुसूचित जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे. |
| **चौदा** | : | मंत्र्यांनी कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे. |
| **पंधरा** | : | शासकीय विधेयक. |
| **सोळा** | : | इतर शासकीय कामकाज ज्याची सूचना नंतर देण्यात येईल. |

**सतरा** : शोक प्रस्ताव.

**अठरा** : इतर प्रस्ताव.

**एकोणीस** : तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर अल्पकालीन चर्चा, म.वि.प.नियम ९७ अन्वये.

**वीस** : तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींकडे मंत्र्यांचे लक्ष वेधणे, म.वि.प.नियम १०१ अन्वये.

**एकवीस** : **अशासकीय विधेयके-विचारार्थ -**

(१) **सन २०१९ चे वि.प.वि. क्रमांक २** - महाराष्ट्र शैक्षणिक परिसंस्था (व्यवस्थापन) (सुधारणा) विधेयक, २०१९ - **श्री. नागोराव गाणार, वि.प.स. यांचे**

(२) **सन २०२० चे वि.प.वि. क्रमांक २ -** डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२० -
**श्री. नागोराव गाणार, वि.प.स. यांचे**

(३) **सन २०२१ चे वि.प.वि. क्रमांक २ -** महाराष्ट्र राज्य विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) करिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण विधेयक, २०२१-
**श्री. कपिल पाटील, वि.प.स.यांचे.**

(४) **सन २०२१ चे वि.प.वि. क्रमांक ७ -** महाराष्ट्र धर्म द्वेषास आणि प्रेषित, पैगंबर व धर्मस्थाने यांची विडंबना करण्यास प्रतिबंध करण्यास विधेयक, २०२१ - **श्री. कपिल पाटील, वि.प.स.यांचे.**

**बावीस : अशासकीय ठराव (म.वि.प. नियम १०२) —**

**श्री. सतिश चव्हाण वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १ व २**

(१) " राज्यातील ग्रामीण भागातील जिल्हापरिषद शाळांची झालेली दयनीय अवस्था विचारात घेवून शाळांसाठी संरक्षक भिंत, पाण्याची सुविधा, मुले व मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, वृक्षारोपण यासाठी शासनाने जिल्हा परिषदांना आवश्यक तो विशेष निधी देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२) " राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षामध्ये उतीर्ण होणा-या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत व योग्य पद्धतीने पूर्वतयारी करून घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचे दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. सुरेश धस वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ३ व ५**

(३) " राज्यातील साखर कारखान्यांसाठी ऊस तोडणे, साळणे व त्यांच्या मोळ्या बांधून बैलगाड्या, ट्रॅक्टर, ट्रकमध्ये माल भरून तो साखर कारखान्यांपर्यंत पोहोचविणे ही कामे करणारा मजुरांचा मोठा वर्ग आहे. हे मजूर मुख्यतः महाराष्ट्राच्या जिरायती व दुष्काळी भागातून साखर कारखान्यांवर काम करण्यासाठी वर्षातील ८ महिने येतात. या मजुरांना साखर कारखान्यांकडून वेठबिगार पद्धतीने राबवली जाते. या मजुरांना इतर कामगारांप्रमाणे मजुरी व सुरक्षितता मिळून त्यांच्या परिस्थितीची पाहणी करून मग मजुरीच्या संदर्भात ऊस तोडणीचे दर ठरविण्यासाठीची वैयक्तिक पद्धत अत्यंत चुकीची असल्याने

ती बदलणे आवश्यक आहे. एकूणच बदल होण्यासाठी तसेच त्यांना विमा संरक्षण, त्यांच्या मुलांना शिक्षण व त्यांच्या स्त्रियांवरील अत्याचार रोखण्यासाठी प्रभावी कायदा करावा अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ”

(५) “ विश्ववंदनीय “ छत्रपती शिवाजी महाराजांचा व स्वराज्य रक्षक ” छत्रपती संभाजी महाराजांच्या गौरवपूर्ण, वैभवशाली, आदर्शवादी, स्वातंत्र्याचं प्रतिक असलेला, महाराष्ट्राची मान जगात स्वाभिमानानं उंचवणारा दृष्टीमान इतिहास हा शालेय शिक्षणात अत्यंत संक्षिप्त स्वरुपात आहे. हा संपूर्ण इतिहास राज्यात इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या अभ्यासक्रमात टप्प्याटप्प्याने समाविष्ट करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

**श्री. विलास पोतनीस वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ७, ८, ९, १० व ११**

(७) “ राज्यात पर्यटनस्थळांचा विकास करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी पर्यटकांसाठी मार्गदर्शक नेमणे व अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देवून त्या माध्यमातून तेथील युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी राज्यातील सर्व पर्यटनस्थळांचे महत्त्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद करीत आहे.”

(८) “ राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांचे अल्प प्रमाण लक्षात घेता, हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत पद्धतीने योग्य प्रकारे पूर्वतयारी करून घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(९) “ राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण, नोकरी व रोजगाराअभावी तरुणांमध्ये निर्माण झालेले वैफल्य, शासनाने बंद केलेला सुशिक्षित बेरोजगार भत्ता, रोजगाराच्या भाग भांडवलासाठी बँकासारख्या आर्थिक संस्थांकडून येणाऱ्या अडचणी, या बाबी विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या सोडवण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तींना रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस हि विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(१०) “ राज्यातील सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालयात आणि सर्व स्तरावरील न्यायालयात, तसेच राज्याच्या एकंदरीत शासकीय व्यवहारांमध्ये मराठीचा १०० टक्के वापर होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करण्याची जबाबदारी राज्य शासनाने मराठी भाषा विभागाकडे सोपवावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(११) “ राज्यात क्रीडा क्षेत्राचा सर्वांगीण विकास होण्याकरिता तसेच दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुकास्तरावर क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत, त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत, अशा केंद्रांना अद्ययावत साहित्य व आर्थिक सहाय्य देण्यात यावे, अशी शिफारस हि विधानपरिषद शासनास करीत आहे.”

**श्री. रामदास आंबटकर वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १२, १३, १६ व १७**

(१२) “ राज्यात विशेषतः विदर्भातील जिल्हा व ग्रामीण रुग्णालयाची स्थिती दयनीय आहे, रुग्णालयातील सोयीसुविधा योग्य नसल्यामुळे रुग्णांना योग्य उपचार मिळत नाहीत, त्यातच रुग्णालयातील देखभाल योग्यरित्या होत नसल्याने रुग्णालयाला आग लागण्याचे प्रकार नुकतेच मागील काही दिवसांत भंडारा, नागपूर, मुंबई व इतरही ठिकाणी घडले आहेत, यामुळे कित्येकांचे मृत्यू झाले आहेत, त्यामुळे रुग्णालयांचे संरचनात्मक लेखापरिक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करून रुग्णांना योग्य

सोय व उपचार होण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने योग्य पाऊल उचलावे व रुग्णालयाची स्थिती सुधारण्याकरिता भरीव निधी उपलब्ध व्हावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(१३) “ राज्यात विशेषतः विदर्भात आदिवासी, दुर्गम व ग्रामीण भाग असून सदरहू परिसरात मोठ्या प्रमाणात शेतकरी वर्ग आहे, परंतु शेतकऱ्यांना आपल्या शेतात जाणे-येणे करण्यास शेतरस्ते उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना हंगामाच्या वेळी कृषी अवजारे, बैल-बंडी, ट्रॅक्टर यासारखी अवजारे ने-आण करण्यास मोठी अडचण निर्माण होते. त्यातच काही परिसरात रस्त्याचे मातीकाम झाले आहे. त्यावर मजबुतीकरण झाले नसल्याने शेतकऱ्यांना जाणे-येणे जिकरीचे झाले आहे. याकरीता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे अभिसरण करून मातोश्री पांदण रस्ते योजना २०२१ मध्ये राबविण्याचा निर्णय घेतला असून सदर योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना रस्ते उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे. “ शेत तेथे रस्ता” या संकल्पनेतून सर्व शेतात जाण्या-येण्याकरिता जिल्हा व तालुक्यातील रस्ते तसेच गावाच्या शिव धुऱ्यांवर शेतकऱ्यांना जाण्या-येण्याकरिता पांदण रस्ते मोठ्या प्रमाणात हाती घेऊन कामे तातडीने सुरू करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(१६) “ राज्यात विशेषतः आदिवासी दुर्गम भागातील शेतकरी गेल्या ७०-८० वर्षांपासून वन जमिनींवर अतिक्रमण करून आपल्या कुटुंबांचा उदर निर्वाह करीत आहेत, परंतू अद्याप अतिक्रमण धारक शेतकऱ्यांना पट्टे मिळाले नाहीत, सदर शेतकरी तीन पिढ्यांपासून असणाऱ्या वन विभागाच्या जाचक अटींमुळे विशेषतः विदर्भातील वन परिसरातील आदिवासी भागातील अतिक्रमण पट्टे धारकता मिळण्यापासून वंचित आहेत, त्यामुळे वन विभागाने जाचक अट रद्द करून अतिक्रमण धारक शेतकऱ्यांना त्वरित शेतजमिनीचे वन पट्टे द्यावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(१७) “ परकीय मुघल राजवटीच्या खाणाखुणा पुसून महाराष्ट्राच्या जाज्वल्य इतिहासाच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी व राज्याची अस्मिता जपण्यासाठी औरंगाबाद या शहराचे “संभाजीनगर” असे नामांतर करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

**श्री. सुनिल शिंदे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १४, १५, २३, २४ व २५**

(१४) “ राज्यात मुंबईसह इतर शहरांतील सदनिकांच्या किंमतीमध्ये सातत्याने होत असलेली प्रचंड वाढ, सदनिकांच्या किंमतीत मूळ किंमतीपेक्षा कितीतरी अधिक पटीने होत असलेल्या वाढीमुळे शहरात सदनिका विकत घेण्याच्या राज्यातील सर्वसामान्य जनतेच्या स्वप्नपूर्तीत निर्माण होत असलेला अडसर, त्यामुळे राज्यातील शहरात सदनिकांचे वाढते दर नियंत्रित करून स्थिर ठेवण्याबाबत सर्वसामान्य जनतेकडून होत असलेली आग्रही मागणी, तदनुषंगाने सदनिकांचे वाढते दर नियंत्रित ठेवण्याकरिता राज्य शासनाने तातडीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(१५) “ राज्यातील विशेषतः मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबई व इतर प्रमुख शहरांचे झपाट्याने होत असलेले नागरीकरण यामुळे वाहनांच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली प्रचंड वाढ, शहरात असलेले अरुंद रस्ते, त्यामुळे ठिकठिकाणी वाहतूकीची कोंडी होऊन नागरिकांना सोसावा लागणारा त्रास, परिणामी वाहतुकीची समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करित आहे.”

(२३) “ राज्यातील पोलिसांना सतत २४ तास काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्यावर दिवसेंदिवस कामाचा ताण वाढत आहे, तसेच पुरेशी शासकीय निवासस्थाने उपलब्ध नसल्यामुळे अनेक पोलिसांना भाड्याच्या घरात राहावे लागत आहे, शासनाकडून देण्यात येत असलेल्या शासकीय निवासस्थानांची अत्यंत दुरवस्था झाली आहे, कामाचा ताण, गृहनिर्माणाचा प्रश्न यांमुळे पोलीस बांधवांत निर्माण होत असलेले

तणावाचे व नैराश्याचे वातावरण, परिणामी त्यांच्यावरील मानसिक ताण वाढत असून आत्महत्येचे प्रमाण वाढत आहे, पोलिसांच्या कार्यक्षमतेचा सर्वंकष विचार होऊन त्यांच्या कामाचे तास, एक साप्ताहिक सुट्टी, निवासस्थाने इत्यादी मुलभूत समस्यांबाबत कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२४) " केंद्र शासनाच्या अखत्यारीतील दादर येथील इंदू मिल्सच्या जागेवर महामानव परम पूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्यदिव्य स्मारक उभारण्याचे काम राज्य शासनाने हाती घेतले आहे, सदरहू निर्णयामुळे महाराष्ट्र शासनाची कीर्ती देशभरातच नव्हे तर पूर्ण जगभरात पसरलेली आहे, कोल्हापूर जिल्ह्यातील छत्रपती श्री शाहू महाराज यांचे इतिहासातील योगदान अमुल्य आहे, कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथे जन्मलेल्या छत्रपती शाहू महाराज यांनी शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात केलेले काम अभूतपूर्व आहे, त्यांच्या या कामाची महती भावी पिढीस होणे गरजेचे आहे, यास्तव राज्य शासनाने केंद्र शासनाच्या अखत्यारीतील इंदू मिल्सच्या जागेवर उभारण्यात येत असलेल्या महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्यदिव्य स्मारकाच्या धर्तीवर मुंबईतील ना. म. जोशी मार्ग व वरळी येथील सीताराम, पोद्दार व अपोलो मिल्स या केंद्र शासनाच्या अखत्यारीतील बंद गिरण्यांपैकी एका गिरणीच्या जागेवर छत्रपती शाहू महाराजांचे भव्यदिव्य स्मारक उभारण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२५) " राज्यात रस्ते अपघातात दरवर्षी हजारो निष्पाप नागरिकांना प्राण गमवावे लागतात, विशेषतः राज्यातील राष्ट्रीय व राज्य महामार्गावर होत असलेल्या अपघातांचे आणि त्यातील मृत्युमुखी पडणाऱ्या नागरिकांचे प्रमाण लक्षणीय असते, सदरहू अपघात रोखण्यासाठी तातडीने प्रभावी उपाययोजना करण्याची असलेली नितांत आवश्यकता,

राष्ट्रीय व राज्य महामार्गावर होत असलेल्या अपघातातील जखमींवर "गोल्डन अवर" मध्ये वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्यासाठी शासकीय आरोग्य व्यवस्थेची असलेली दुरवस्था, त्यामुळे राज्यातील राष्ट्रीय व राज्य महामार्गावर अपघातग्रस्तांना "गोल्डन अवर" मध्ये वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून ठराविक अंतरावर "ट्रामा केअर सेंटर" उभारण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद करीत आहे."

**ॲड. निरंजन डावखरे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १८, १९, २०, २१ व २२**

(१८) " राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यामध्ये रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पद्धतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१९) " राज्यातील किल्ले व दुर्ग यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता या किल्ले व दुर्गांचा परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठीकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व किल्ल्यांचे व दुर्गांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२०) " राज्यातील क्रीडा क्षेत्राचा सर्वांगीण विकास होण्याकरिता तसेच दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुकास्तरावर क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत, त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात

यावेत, अशा केंद्रांना अद्ययावत साहित्य व आर्थिक सहाय्य देण्यात यावे, अशी शिफारस हि विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(२१) “ निजामी राजवटीच्या पाऊलखुणा संपुष्टात आणून स्थानिक वैशिष्ट्य असलेल्या लेण्यांची ख्याती सर्वदूर वृध्दींगत करण्याच्या दृष्टीने “उस्मानाबाद” या शहराचे “धाराशीव” असे नामांतर करण्यात यावे, असा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठवावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(२२) “ परकीय मुघल राजवटीच्या खाणाखुणा पुसून महाराष्ट्राच्या जाज्वल्य इतिहासाच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी व राज्याची अस्मिता जपण्यासाठी “औरंगाबाद” या शहराचे “संभाजीनगर” असे नामांतर करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

**डॉ. (श्रीमती) मनिषा कायंदे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक २६, २७, २८, २९ व ३०**

(२६) “ राज्यातील अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असून या कारखान्यांतील प्रदुषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदीकाठावरील अनेक गावांमध्ये विशेषतः कोकण व पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी दुषित झाले असून नागरीकांना ते पाणी पिण्याची वेळ येत असून आजुबाजूच्या रहिवाश्यांच्या आरोग्यावर तसेच मच्छिमार बांधवाच्या उपजीविकेच्या साधनांवर व नद्यांमधील पाणी प्यायल्याने जनावरांवर होणारा विपरित परिणाम लक्षात घेता राज्यातील जलप्रदुषणावर प्रभावीरित्या आळा घालण्यासाठी शासनाने कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(२७) “ राज्यातील उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणात स्थानिक भूमीपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमिपुत्रांची संख्या नगण्य

असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरूणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरूणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयांमध्ये नोकरी देताना भूमीपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२८) " राज्यातील विनाअनुदान तत्वावरील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२९) " राज्यातील बहूतांश नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व विविध प्रकारचे उद्योग उभारण्यात आले आहेत. या कारखान्यांतील प्रदूषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदीकाठावरील अनेक गावांमध्ये विशेषतः कोकण व पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झाले आहे. त्यामुळे रहिवाशांच्या आरोग्यावर आणि मच्छिमार बांधवाच्या उपजिविकेच्या साधनांवर विपरीत परिणाम झाला आहे. हे लक्षात घेता राज्यातील जलप्रदूषण समस्या सोडविण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३०) " राज्यातील किल्ले व दुर्ग यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता या किल्ले व दुर्गांचा परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठीकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यकक सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व किल्ल्यांचे

व दुर्गांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

**श्री. अंबादास दानवे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ३१, ३२, ३३ व ३५**

(३१) “ परकीय मुघल राजवटीच्या खाणाखुणा पुसून महाराष्ट्राच्या जाज्वल्य इतिहासाच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी व राज्याची अस्मिता जपण्यासाठी “औरंगाबाद” या शहराचे “संभाजीनगर” असे नामांतर करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(३२) “ शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असूनही पीक विमा नुकसान भरपाईपासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत आहेत, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटिशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(३३) “ राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतातील विहिरी व विद्युत पंपाचा मोठ्या प्रमाणात राहिलेला अनुशेष, विद्युत जोडणी मिळण्याकरीता होणारा विलंब त्यामुळे विद्युत पंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात राबविल्या जाणाऱ्या फळबाग विकास योजनांचे पाण्याअभावी होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(३५) " राज्यात विशेषतः मराठवाड्यात सतत निर्माण होणारा भीषण दुष्काळ आणि तीव्र पाणी टंचाईची परिस्थिती लक्षात घेता दुष्काळ निवारणार्थ करावयाच्या कायमस्वरूपी उपाययोजना, मराठवाड्यात शाश्वत शेतीसाठी सिंचन अभियान सुरू करून मराठवाड्यातील सिंचनाचा जलआराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी करण्यासाठी मराठवाड्यासाठी सक्षम जल आयुक्तालय सुरू करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ३६ व ३७**

(३६) " निजामी राजवटीच्या पाऊलखुणा संपुष्टात आणून स्थानिक वैशिष्ट्य असलेल्या लेण्यांची ख्याती सर्वदूर वृध्दींगत करण्याच्या दृष्टीने उस्मानाबाद या शहराचे "धाराशीव" असे नामांतर करण्यात यावे, असा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठवावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३७) " परकीय मुघल राजवटीच्या खाणाखुणा पुसून महाराष्ट्राच्या जाज्वल्य इतिहासाच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी व राज्याची अस्मिता जपण्यासाठी औरंगाबाद या शहराचे "संभाजीनगर" असे नामांतर करण्यात यावे असा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठवावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. वसंत खंडेलवाल वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ३८ व ३९**

(३८) " निजामी राजवटीच्या पाऊलखुणा संपुष्टात आणून स्थानिक वैशिष्ट्य असलेल्या लेण्यांची ख्याती सर्वदूर वृध्दींगत करण्याच्या दृष्टीने "उस्मानाबाद" या शहराचे धाराशीव असे नामांतर करण्यात यावे, असा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठवावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३९) " परकीय मुघल राजवटीच्या खाणाखुणा पुसून महाराष्ट्राच्या जाज्वल्य इतिहासाच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी व राज्याची अस्मिता जपण्यासाठी औरंगाबाद या शहराचे "संभाजीनगर" असे नामांतर करण्यात यावे

असा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठवावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. प्रविण पोटे-पाटील वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ४० व ४१**

(४०) " परकीय मुघल राजवटीच्या खाणाखुणा पुसून महाराष्ट्राच्या जाज्वल्य इतिहासाच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी व राज्याची अस्मिता जपण्यासाठी औरंगाबाद या शहराचे "संभाजीनगर" असे नामांतर करण्यात यावे असा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठवावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४१) " निजामी राजवटीच्या पाऊलखुणा संपुष्टात आणून स्थानिक वैशिष्ट्य असलेल्या लेण्यांची ख्याती सर्वदूर वृध्दींगत करण्याच्या दृष्टीने उस्मानाबाद या शहराचे "धाराशीव" असे नामांतर करण्यात यावे, असा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठवावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. राजहंस सिंह वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ४२ व ४३**

(४२) " निजामी राजवटीच्या पाऊलखुणा संपुष्टात आणून स्थानिक वैशिष्ट्य असलेल्या लेण्यांची ख्याती सर्वदूर वृध्दींगत करण्याच्या दृष्टीने उस्मानाबाद या शहराचे "धाराशीव" असे नामांतर करण्यात यावे, असा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठवावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४३) " परकीय मुघल राजवटीच्या खाणाखुणा पुसून महाराष्ट्राच्या जाज्वल्य इतिहासाच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी व राज्याची अस्मिता जपण्यासाठी औरंगाबाद या शहराचे "संभाजीनगर" असे नामांतर करण्यात यावे, असा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठवावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. प्रवीण दटके वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ४४ व ४५**

(४४) " परकीय मुघल राजवटीच्या खाणाखुणा पुसून महाराष्ट्राच्या जाज्वल्य इतिहासाच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी व राज्याची अस्मिता जपण्यासाठी औरंगाबाद या शहराचे "संभाजीनगर" असे नामांतर करण्यात यावे, असा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठवावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.

(४५) " निजामी राजवटीच्या पाऊलखुणा संपुष्टात आणून स्थानिक वैशिष्ट्य असलेल्या लेण्यांची ख्याती सर्वदूर वृध्दींगत करण्याच्या दृष्टीने उस्मानाबाद या शहराचे "धाराशीव" असे नामांतर करण्यात यावे, असा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठवावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. प्रसाद लाड वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ४६ व ४७**

(४६) " निजामी राजवटीच्या पाऊलखुणा संपुष्टात आणून स्थानिक वैशिष्ट्य असलेल्या लेण्यांची ख्याती सर्वदूर वृध्दींगत करण्याच्या दृष्टीने उस्मानाबाद या शहराचे "धाराशीव" असे नामांतर करण्यात यावे, असा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठवावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४७) " परकीय मुघल राजवटीच्या खाणाखुणा पुसून महाराष्ट्राच्या जाज्वल्य इतिहासाच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी व राज्याची अस्मिता जपण्यासाठी औरंगाबाद या शहराचे "संभाजीनगर" असे नामांतर करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. चंदूभाई पटेल वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ४८ व ५८**

(४८) " निजामी राजवटीच्या पाऊलखुणा संपुष्टात आणून स्थानिक वैशिष्ट्य असलेल्या लेण्यांची ख्याती सर्वदूर वृध्दींगत करण्याच्या दृष्टीने उस्मानाबाद या शहराचे "धाराशीव" असे नामांतर करण्यात यावे, असा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठवावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५८) " परकीय मुघल राजवटीच्या खाणाखुणा पुसून महाराष्ट्राच्या जाज्वल्य इतिहासाच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी व राज्याची अस्मिता जपण्यासाठी औरंगाबाद या शहराचे "संभाजीनगर" असे नामांतर करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. निलय नाईक वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ४९ व ५०**

(४९) " परकीय मुघल राजवटीच्या खाणाखुणा पुसून महाराष्ट्राच्या जाज्वल्य इतिहासाच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी व राज्याची अस्मिता जपण्यासाठी औरंगाबाद या शहराचे "संभाजीनगर" असे नामांतर करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५०) " निजामी राजवटीच्या पाऊलखुणा संपुष्टात आणून स्थानिक वैशिष्ट्य असलेल्या लेण्यांची ख्याती सर्वदूर वृध्दींगत करण्याच्या दृष्टीने उस्मानाबाद या शहराचे "धाराशीव" असे नामांतर करण्यात यावे, असा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठवावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. नागोराव गाणार वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ५१, ५३ व ५४**

(५१) " राज्यातील विनाअनुदान तत्वावर मान्यता देऊन सुरू करण्यात आलेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी-सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५३) “ परकीय मुघल राजवटीच्या खाणाखुणा पुसून महाराष्ट्राच्या जाज्वल्य इतिहासाच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी व राज्याची अस्मिता जपण्यासाठी औरंगाबाद या शहराचे “संभाजीनगर” असे नामांतर करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(५४) “ निजामी राजवटीच्या पाऊलखुणा संपुष्टात आणून स्थानिक वैशिष्ट्य असलेल्या लेण्यांची ख्याती सर्वदूर वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने उस्मानाबाद या शहराचे “धाराशीव” असे नामांतर करण्यात यावे, असा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठवावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

**श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ५६ व ५७**

(५६) “ परकीय मुघल राजवटीच्या खाणाखुणा पुसून महाराष्ट्राच्या जाज्वल्य इतिहासाच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी व राज्याची अस्मिता जपण्यासाठी औरंगाबाद या शहराचे “संभाजीनगर” असे नामांतर करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(५७) “ निजामी राजवटीच्या पाऊलखुणा संपुष्टात आणून स्थानिक वैशिष्ट्य असलेल्या लेण्यांची ख्याती सर्वदूर वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने उस्मानाबाद या शहराचे “धाराशीव” असे नामांतर करण्यात यावे, असा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठवावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ५९ व ६०**

(५९) “ निजामी राजवटीच्या पाऊलखुणा संपुष्टात आणून स्थानिक वैशिष्ट्य असलेल्या लेण्यांची ख्याती सर्वदूर वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने उस्मानाबाद या शहराचे “धाराशीव” असे नामांतर करण्यात यावे, असा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठवावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(६०) “ परकीय मुघल राजवटीच्या खाणाखुणा पुसून महाराष्ट्राच्या जाज्वल्य इतिहासाच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी व राज्याची अस्मिता जपण्यासाठी औरंगाबाद या शहराचे “संभाजीनगर” असे नामांतर करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

**श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ६१**

(६१) “ सन २०२२ मध्ये देशाच्या स्वातंत्र्याला ७५ वर्ष पूर्ण होत असून हे वर्ष अमृत महोत्सव वर्ष म्हणून साजरे करण्यात येणार आहे. परंतु देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतरदेखील हैद्राबाद संस्थानाला स्वातंत्र्य मिळाले नव्हते. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या निर्णयामुळे पोलीस कारवाई (पोलिस ॲक्शन) नंतर एक वर्ष एक महिन्याने हैद्राबाद संस्थान स्वतंत्र हिंदुस्थानात विलीन झाले. दिनांक १५ ऑगस्ट, १९४७ या दिवशी हिंदुस्थानाला स्वातंत्र्य मिळाले तरी मराठवाडा विभाग हा हैद्राबाद संस्थानात असल्यामुळे मराठवाडा विभागाला स्वातंत्र्य मिळण्याकरिता दिनांक १७ सप्टेंबर, १९४८ हा स्वातंत्र्यदिवस उजडावा लागला. महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार देशाचा स्वातंत्र्यदिन १५ ऑगस्ट रोजी साजरा केला जातो. परंतु मराठवाडा विभागात दिनांक १७ सप्टेंबर हा दिन मराठवाडा मुक्ती संग्राम दिन म्हणून साजरा केला जातो. देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव दिनांक १५ ऑगस्ट, २०२२ हे वर्ष साजरा करण्यात येणार असून मराठवाडा विभाग त्यामध्ये सामील असेल, मात्र एक वर्ष एक महिन्यानंतर म्हणजेच दिनांक १७ सप्टेंबर, २०२३ रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन हे अमृत महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करण्यात येणार आहे. दिनांक १७ सप्टेंबर, १९९८ सालापासून हैद्राबाद मुक्ती संग्राम दिन हा मराठवाडा विभागात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन म्हणून ध्वजारोहणाने साजरा करण्यात येतो. दिनांक १७ सप्टेंबर, २०२३ हे वर्ष हैद्राबाद मुक्ती संग्राम दिनाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे होणार आहे. या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने वर्षभरात विविध कार्यक्रम आयोजित

केलेले आहेत. यात मराठवाड्यातील सर्व जिल्हे व तालुक्यातून रॅलीचे आयोजन करण्यात येणार आहे. या रॅलींचे स्वागत शासन स्तरावर करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ६२, ६३, ६४, ६५ व ६६**

(६२) "राज्यात वेळोवेळी पडणाऱ्या दुष्काळाची तीव्रता लक्षात घेता, पावसाळा संपत असतानाच पुढील वर्षभरासाठी राज्यातील पाणीसाठा जतन करण्याची आवश्यकता, राज्यातील जनतेला लागणारे पिण्याचे पाणी, शेतीसाठी लागणारे पाणी, औद्योगिक वसाहती व कारखान्यांना आणि अन्य घटकांना लागणाऱ्या पाण्याचे न्याय्य वाटप होऊन प्रत्येकाला पुरेसे पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सुरुवातीपासूनच विभागवार घेतली जाणारी पिके, त्या भागातील उपलब्ध पाणीसाठा व लोकसंख्या यांचा विचार करून प्रत्येक घटकाला वर्षभर पाणी कसे पुरेल याबाबत पूर्वनियोजन करून त्याची शासनस्तरावर काटेकोर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६३) " राज्यात विशेषतः मराठवाड्यात सतत निर्माण होणारा भीषण दुष्काळ आणि तीव्र पाणी टंचाईची परिस्थिती लक्षात घेता दुष्काळ निवारणार्थ करावयाच्या कायमस्वरूपी उपाययोजना, मराठवाड्यात शाश्वत शेतीसाठी सिंचन अभियान सुरू करून मराठवाड्यातील सिंचनाचा जल आराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी करण्यासाठी मराठवाड्यासाठी सक्षम जल आयुक्तालय सुरू करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६४) " राज्यातील विशेषतः मराठवाड्यातील सर्व गावे बारमाही वाहतुकीसाठी योग्य व्हावीत याकरिता सर्व ग्रामीण भागातील रस्त्यांची पाहणी करून आवश्यक असेल तेथे नद्या, खाड्या, नाले व मोऱ्या यांचेवर

पूल बांधण्याची धडक योजना शासनाने हाती घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६५) " राज्यातील अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व अनेक प्रकारचे उद्योग उभारण्यात आले असून या कारखान्यांतील प्रदूषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदीकाठावरील अनेक गावांमध्ये विशेषतः कोकण व पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झाले असून त्यामुळे रहिवाशांच्या आरोग्यावर आणि मच्छिमार बांधवाच्या उपजीविकेच्या साधनांवर होणारा विपरीत परिणाम लक्षात घेता राज्यातील जलप्रदूषण समस्येवर उपाय शोधून जलप्रदूषणास प्रभावीरीत्या आळा घालण्यासाठी शासनाने कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६६) " शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशक यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**डॉ. प्रज्ञा सातव, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ६७, ६८, ६९ व ७०**

(६७) " राज्यात विशेषतः मराठवाड्यात सतत निर्माण होणारा भीषण दुष्काळ आणि तीव्र पाणी टंचाईची परिस्थिती लक्षात घेता दुष्काळ निवारणार्थ मराठवाड्यात शाश्वत सिंचन अभियान सुरू करून मराठवाड्यातील सिंचनाचा जल आराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी करण्यासाठी मराठवाड्यासाठी सक्षम जल आयुक्तालय सुरू करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६८) “ राज्यात देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळाडूंचे देशी खेळांकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषतः ग्रामीण भागातील होतकरु व तरुण खेळाडू, देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रीडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरीता शासनाच्या क्रीडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा,अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(६९) “ राज्यात अनाथ, निराधार, परितक्त्या, घटस्फोटित, विधवा, अनैच्छिक मातृत्व लाभलेल्या आपादग्रस्त व शिक्षणाचा अभाव असणाऱ्या महिलांचा यात होणारा शारीरिक, मानसिक व सामाजिक छळ थांबवून त्यांची शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नती होण्याच्यादृष्टीने महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी शासनाने कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(७०) “ राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र विकसित करण्यासाठी तसेच त्या ठीकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देऊन या सर्व पुरातन किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

**श्री. राजेश राठोड वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ७२, ७३ व ७४**

(७२) “ विदर्भात नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असुनही पीक विमा नुकसान भरपाईपासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत आहे. याला शंभर वर्षे जुनी ब्रिटीशकालीन

आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७३) "शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता उत्पादन खर्चावर आधारित शेतमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्यशासनाने आग्रही भुमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७४) "राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतातील विहिरी व विद्युत पंपाचा मोठ्या प्रमाणात राहिलेला अनुशेष, विद्युत जोडणी मिळण्याकरिता होणारा विलंब त्यामुळे विद्युतपंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात राबविल्या जाणाऱ्या ऊस पिकांचे पाण्याअभावी होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**डॉ. सुधीर तांबे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ७५, ७६ व ७७**

(७५) "राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना घ्यावयाचे सर्व माध्यमातील शिक्षण हे अधिक परिणामकारक, प्रभावी होण्यासाठी आणि भविष्यात सक्षम पिढी उभी राहण्यासाठी सर्व शिक्षण विभाग (शालेय शिक्षण, उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण, आश्रमशाळा, अंध, अपंग, मूक-बधिर शाळा, आदिवासी आश्रम शाळा) हे मंत्रालयातील एकाच विभागाच्या अधिपत्याखाली आणावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७६) “ राज्यातील पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी सुमारे एक लाख अंगणवाड्यांची संख्या असली तरी या अंगणवाड्याद्वारे दर्जेदार पूर्व प्राथमिक शिक्षण मिळत नाही, वैद्यकीय शास्त्रानुसार लहान मुलांच्या मेंदूची ९० टक्के वाढ ही त्यांच्या सहा वर्षापर्यत होत असते, विद्यार्थ्यामध्ये शैक्षणिक आवड निर्माण होणे, ज्ञानेंद्रियांचा योग्य विकास होणे, तसेच बौद्धीक विकासाच्या दृष्टीने हा कालावधी अत्यंत महत्वाचा असल्याने यासाठी शिक्षण देण्यासाठी तज्ञांची समिती गठीत करुन विशेष कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(७७) “ शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत दिली जाते, त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटूंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यालयांमार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

**श्री. अमोल मिटकरी वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ७८, ७९, ८०, ८१ व ८२**

(७८) “ दिनांक १४ ऑक्टोबर, १९५६ रोजी वा त्यानंतर राज्यातील महार, मांग व चांभार व इतर तत्सम जातीतील लोकांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केल्याने शासनाने दिनांक ६ जुलै, १९६० च्या परिपत्रकान्वये अनुसूचित जातीतून धर्मांतरीत बौद्धांना त्यांनी केवळ धर्म बदलला म्हणून त्यांची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थिती बदलली नसल्याच्या कारणावरुन आरक्षण लागू करणे, त्यानंतर दिनांक १ ऑक्टोबर, १९६२ रोजी शासनाने धर्मांतरीत बौध्दांना अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र देण्याचा आदेश देणे, भारतीय संविधानात ३६६ (२४) मध्ये अनुसूचित जातीची व्याख्या केलेली असून तसेच अनुच्छेद ३४१ अन्वये राष्ट्रपतींना संबंधित राज्याच्या राज्यपालांशी विचार विनिमय करुन अनुसूचित जाती म्हणून मानल्या जातील त्या जाती, वंश किंवा जनजाती अथवा जाती, वंश किंवा जनजाती यांचे भाग

किंवा त्यातील गट विनिर्दिष्ट करण्याचे अधिकार असणे, "महार" वा इतर तत्सम अनुसूचित जातीतील व्यक्तीने बौध्द धर्मात प्रवेश केला असला तरी त्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती पूर्वीसारखीच असल्याचे मुंबई उच्च न्यायालयाने गोपालकृष्ण चव्हाण विरुद्ध महाराष्ट्र राज्य या प्रकरणात निकाल देणे, धर्मांतरीत बौध्दांची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थिती मागासलेली असणे या कारणावरुन केंद्र शासनाने सन १९९० ला संविधानात सुधारणा करुन कायदा करणे, त्यात हिंदू, शीख व बौध्द धर्मातील अनुसूचित जातीच्या लोकांनाही आरक्षण देण्याची तरतूद करण्यात येणे, सदरचा बदल केवळ हिंदू व शिख या धर्मातील अनुसूचित जातीलाच लागू करणे त्यातील बौध्द धर्मांतरीत अनुसूचित जातीला वगळण्यात येणे, याबाबत राज्यातील जनतेने वारंवार मागणी करुनही तसा बदल अनुसूचित जातीच्या अनुसूचिमध्ये केंद्र शासनाने अद्याप न करणे, याबाबत लोकांमध्ये असंतोष व तीव्र संतापाची भावना निर्माण होणे, अनुसूचिमध्ये राज्यातील बौध्द धर्मात धर्मांतर केलेल्या लोकांना केंद्र शासनाने शैक्षणिक व लोकसेवांमध्ये आरक्षण नाकारणे, महार व इतर तत्सम अनुसूचित जातीतील लोकांची आर्थिक, सामाजिक स्थिती अद्यापही सुधारली नसल्यामुळे व त्यांचा जीवनमानाचा दर्जा उंचावला गेला नसल्यामुळे अनुसूचित जातीतून धर्मांतर केलेल्या बौध्दांना केंद्र शासन राबवित असलेल्या शैक्षणिक व लोकसेवांमध्ये आरक्षण मिळण्याची नितांत आवश्यकता, याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे अनुसूचित जातीतील महार, मांग व चांभार इत्यादीं बौध्द धर्मांतरीत लोकांचा बौध्द म्हणून अनुसूचित जातीच्या अनुसूचिमध्ये समावेश करुन राज्यातील जनतेची शैक्षणिक व लोकसेवांमध्ये आरक्षण देण्यासंदर्भातील आग्रही मागणी केंद्र शासनाकडे करण्याचा आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करित आहे."

(७९) “ राज्यातील किल्ले व दुर्ग यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता या किल्ले व दुर्गांचा परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठीकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व किल्ल्यांचे व दुर्गांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने किल्ल्यांची झालेली दुरवस्था थांबवण्यासाठी शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(८०) “ राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यामध्ये रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पद्धतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(८१) “ शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(८२) “ राज्यात दिवसेंदिवस वाढत चाललेली महागाई तसेच सेवायोजन कार्यालयात नाव नोंदणी करुनही सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीची संधी प्राप्त होत नाहीत, सेवायोजन कार्यालयाकडून नोकरीसाठी मुलाखतपत्रही प्राप्त होत नाहीत, परिणामी बेरोजगारांना चरितार्थासाठी कोणतेही साधन उपलब्ध न झाल्याने चरितार्थ चालविणे जिकरीचे झाले आहे, म्हणून पदवी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पूढील ३ वर्षात

नोकरी न मिळालेल्या बेरोजगारांना आर्थिक मदत म्हणून प्रतिमाह रुपये २५००/- बेकारी भत्ता देण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. रमेश कराड वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ८३ व ८४**

(८३) "परकीय मुघल राजवटीच्या खाणाखुणा पुसून महाराष्ट्राच्या जाज्वल्य इतिहासाच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी व राज्याची अस्मिता जपण्यासाठी औरंगाबाद या शहराचे "संभाजीनगर" असे नामांतर करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(८४) "निजामी राजवटीच्या पाऊलखुणा संपुष्टात आणून स्थानिक वैशिष्ट्य असलेल्या लेण्यांची ख्याती सर्वदूर वृध्दींगत करण्याच्या दृष्टीने उस्मानाबाद या शहराचे "धाराशीव" असे नामांतर करण्यात यावे, असा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठवावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**डॉ. वजाहत मिर्झा वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ८५, ८७, ८८ व ८९**

(८५) "राज्यात अल्पसंख्याक समाजातील नागरिकांची अवस्था चिंताजनक आहे, या समाजात शिक्षण व रोजगाराच्या संधी कमी प्रमाणात उपलब्ध होत असल्याने हा समाज विकासापासून वंचित आहे, राज्य शासनाच्या अनेक योजना या समाजापर्यंत पोहोचत नसल्याने या समाजाला अनेक लाभ मिळत नाहीत, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ हे फक्त नावापुरते उरलेले आहे, या महामंडळाद्वारे एकाही ठीकाणी एकही व्यवसायिक व थेट कर्ज पूर्ण करण्यात आले नाही, मागील तीन वर्षांपासून या महामंडळाची कार्यकारणी सुद्धा घोषित केली नसून शासनाकडून या महामंडळास निधीही उपलब्ध करून दिला जात नाही, तसेच या समाजातील हजारो विद्यार्थ्यांना अनेक वर्षांपासून शिष्यवृत्ती देखील मिळत नाही, शाळांना योग्य अनुदान देखील मिळत नसल्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात देखील अल्पसंख्याक

समाजातील विद्यार्थी मागास राहत आहेत, यामुळे या समाजातील नागरिकांच्या आर्थिक व शैक्षणिक मागासलेपणामध्ये वाढ होऊन हा समाज विकासापासून दूरच राहिला आहे, या समाजाच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक उत्कर्षासाठी शासनाने अधिकाधिक प्रभावी उपाययोजना आखाव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(८७) " राज्यात अनेक ठीकाणी पाणी टंचाईची स्थिती निर्माण झाली असून, ग्रामीण भागातील नागरिकांना चार-पाच मैल दूरवरुन पाणी आणण्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे. पावसाळ्यातील पाण्याची अनियमितता, निसर्गाचा लहरीपणा, त्यामुळे निर्माण होणारी भीषण पाणीटंचाई परिणामी पिण्याच्या पाण्यासाठी होणारी भटकंती ही अतिशय गंभीर बाब झालेली आहे, त्यावर जलतज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून वेगवेगळी उपाययोजना करण्याची आवश्यकता, (उदा. रेन वॉटर हार्वेस्टींग) परंतू याबद्दलची अंमलबजावणी होताना दिसत नाही, महाराष्ट्रातील सर्व शासकीय इमारतींच्या छतावर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे एकत्रीकरण (रेन वॉटर हार्वेस्टींग) करुन त्याचे इमारतीच्या आवारातील जमिनीत पाण्याच्या स्त्रोताजवळ पुनर्भरण करण्याची आवश्यकता आहे, शहरी भागांमध्ये हॉटेल्स, रेस्टॉरेंट व इतर ठीकाणी मोठ्या प्रमाणामध्ये पाण्याचा अपव्यय होताना दिसतो, तो देखील टाळण्याची आवश्यकता आहे, अशा अनेक उपाययोजना केल्यास राज्यात पिण्यासाठी, शेतीसाठी, औद्योगिक कामांसाठी व इतर वापरासाठीच्या पाण्याचा प्रश्न नक्कीच मार्गी लागेल. यासाठी शासनाकडून कठोर निर्देश देण्याची गरज आहे. तसेच राज्यात खाजगी नवीन इमारत बांधकाम करीत असताना बांधकाम परवाना देण्यासाठी जसे इतर बाबी तपासण्यात येतात, तसेच राज्यातील ग्रामपंचायत ते महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या इमारतीवरील छताचे पाणी त्या आवारातील जलस्त्रोतात सोडण्याचे नियोजन आहे किंवा कसे हे

तपासूनच बांधकाम परवानग्या द्याव्यात व अशाप्रकारे विविध उपाययोजना करुन पावसाचे पाणी व वैयक्तिक वापरासाठी असलेले पाणी यांचे योग्य नियोजन करण्यासाठी शासनाने अधिकाधिक उपाययोजना कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(८८) “ राज्यातील विनाअनुदान तत्वावरील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(८९) “ राज्यात अनेक ठीकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या अपघातात गेलेले आहेत. राज्याचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठ्या प्रमाणामध्ये अशाप्रकारचे अपघात होत आहेत. हे अपघात रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे. अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नाहीत. या अपघातग्रस्तांना उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग येथे आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरू करणे आवश्यक आहे. तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक देखील करण्याची आवश्यकता आहे. राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गावर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठीकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रामा सेंटर (Trauma Care Center) उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे सोपे होऊन जाईल व यामधून दरवर्षी वाढत आलेली अपघातातील मृतांची संख्या आटोक्यात

आणण्यात निश्चितच उपयोगी ठरेल. तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रामा सेंटर (Trauma Care Center) उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. जयंत आसगावकर वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ९०, ९१, ९२ व ९३**

(९०) "राज्यातील विनाअनुदान तत्त्वावरील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्त्वावरील राज्यातील सर्व माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी ह्या सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(९१) "राज्यात अनेक ठिकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या अपघातात गेलेले आहेत. राज्याचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठ्या प्रमाणामध्ये अशा प्रकारचे अपघात होत आहेत. हे अपघात रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे. अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नाहीत. या अपघातग्रस्तांना उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग येथे आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरू करणे आवश्यक आहे. तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक देखील करण्याची आवश्यकता आहे. राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गावर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रामा सेंटर (Trauma Care Center)

उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे सोपे होऊन जाईल व यामधून दरवर्षी वाढत आलेली अपघातातील मृतांची संख्या आटोक्यात आणण्यात निश्चितच उपयोगी ठरेल. तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रामा सेंटर (Trauma Care Center) उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(९२) " केंद्र शासनाने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्रामसडक योजना अंमलात आणलेली आहे. त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरूस्ती व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरू कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(९३) " राज्यात प्रत्येक जिल्ह्यात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याची गरज लक्षात घेता, ज्या विभागामध्ये खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालये बंद पडण्याच्या अवस्थेत आहेत, तेथे ती ताब्यात घेऊन पायाभूत सुविधांचा वापर करून शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये सुरू करावीत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. अभिजित वंजारी वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ९४, ९५, ९७ व ९८**

(९४) " राज्यातील वेगवेगळया प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनांचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्यामुळे विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इत्यादी बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे प्रलंबित काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(९५) “ राज्यात ज्येष्ठ नागरिकांच्या हितासाठी विविध निर्णय व धोरण ठरविलेले असताना ज्येष्ठ नागरिकांचे जगणे अत्यंत जिकरीचे होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे, ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या, सुरक्षितता यासाठी ज्येष्ठ नागरिकांच्या हितासंबंधी धोरण ठरवून जनजागृती होण्याच्या दृष्टीने वृध्दांसाठी स्वतंत्र हेल्पलाईन (मदतकेंद्र) व संकेतस्थळ सुरू करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(९७) “ राज्यात देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळांडूचे देशी खेळांकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषतः ग्रामीण भागातील होतकरू व तरुण खेळाडू, देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रीडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरिता शासनाच्या क्रीडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा,अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(९८) “ राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याची गरज लक्षात घेता, ज्या विभागामध्ये खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालये बंद पडण्याच्या अवस्थेत आहेत, तेथे ती ताब्यात घेऊन पायाभूत सुविधांचा वापर करून शासकीय अभियांत्रिकी माहविद्यलाये सुरू करावीत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

**श्री. प्रविण दरेकर वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ९९, १०१ व १०२**

(९९) “ निजामी राजवटीच्या पाऊलखुणा संपुष्टात आणून स्थानिक वैशिष्ट्य असलेल्या लेण्यांची ख्याती सर्वदूर वृध्दींगत करण्याच्या दृष्टीने उस्मानाबाद या शहराचे धाराशीव असे नामांतर करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(१०१) “ सिंधुदुर्ग जिल्हा माहे एप्रिल १९९७ मध्ये पर्यटन जिल्हा म्हणून जाहिर करण्यात आला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याला प्रशस्त, सुंदर, निळाशार, सुरक्षित समुद्र किनारे व पुरातन ऐतिहासिक मंदिरे, देवस्थाने, गडकिल्ले, घनदाट अरण्ये, सृष्टीसौंदर्याची लयलूट, सण व लोककला आदी पर्यटनदृष्ट्या पोषक असलेल्या सर्व बाबींनी परिपूर्ण असा प्रदेश लाभला आहे. निसर्गरम्य कोकणात कोणत्याही ऋतुमध्ये केलेली भटकंती ही कायमच रमणीय असते. इतकेच नव्हे तर देशातील पर्यटन क्षेत्राचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी देशाचे मा.पंतप्रधान यांनी स्वदेश दर्शन ही महत्त्वाकांक्षी योजना यापूर्वीच हाती घेतली असून या योजनेत महाराष्ट्र राज्यातून सिंधुदुर्ग जिल्ह्याची निवड केलेली आहे. शेजारच्या गोवा तसेच केरळ या राज्यांनी देशविदेश पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी विविध योजना राबविल्यामुळे ही राज्ये पर्यटनदृष्ट्या विकसित झालेली असून पर्यटनाच्या व्यवसायावर त्या राज्यांतील स्थानिक जनतेला मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधीही प्राप्त झालेल्या आहेत. स्थानिक तसेच विदेशी पर्यटकांना निसर्ग, पर्यावरण, जैवविविधता, हस्तकला व सागरी किनाऱ्यांची भुरळ पडते. इतकेच नव्हेतर, सिंधुदुर्ग जिल्ह्यात प्रत्येक गावाचा पर्यटनातून विकास शक्य असून पर्यटनामध्ये सर्वात जास्त रोजगार देण्याची क्षमता आहे. कोकणचे नाव पर्यटनाच्या माध्यमातून जगाच्या नकाशावर जाईल यासाठी येथील पर्यटनाला चालना देण्याचे प्रयत्न व्हावयास हवेत. कोकणात पर्यटनासाठी नैसर्गिक क्षमता मुळात उपलब्ध असून ती वाढविण्याची तसेच पर्यटन स्थळाची प्रसिद्धी करण्याची व त्याव्दारे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करण्याची गरज असतानाही पर्यटन व्यवसाय वाढविण्यासाठी शासनाकडून आजमितीस आवश्यक ते प्रयत्न, उपाययोजना झालेली नाही. शासनाने गोवा, केरळ राज्याप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या पर्यटन विकासाच्या दृष्टीने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी ही विधानपरिषद शासनास शिफारस करीत आहे.”

(१०२) " परकीय मुघल राजवटीच्या खाणाखुणा पुसून महाराष्ट्राच्या जाज्वल्य इतिहासाच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी व राज्याची अस्मिता जपण्यासाठी औरंगाबाद या शहराचे "संभाजीनगर" असे नामांतर करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. सदाशिव खोत वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १०५, १०६ व १०९**

(१०५) " राज्यातील अनेक कृषि उत्पादनाला भौगोलिक मानांकन (Geographical Indication) नसल्यामुळे त्यांना कमी दर मिळत आहे. भौगोलिक भागातील वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांना भौगोलिक मानांकनासाठी (Geographical Indication) प्रयत्न व्हावेत यासाठी कृषि क्षेत्रातील अनेक शेतीतज्ज्ञ मंडळी आग्रही आहेत. दार्जिलिंग चहा भौगोलिक मानांकनामुळे (Geographical Indication) ९० देशात विकला जातो. शाम्पियन फ्रान्समधील एका गावाचे नाव आहे तरी देखील ९०% शाम्पियनन नैसर्गिक पेय म्हणून निर्यात होते. युरोप आणि चीनने एका हजाराहून अधिक कृषि उत्पादनांना भौगोलिक मानांकन (Geographical Indication) संरक्षण दिले आहे. भारतात अंदाजे ११२ उत्पादनांना भौगोलिक मानांकन (Geographical Indication) संरक्षण दिल्याचे समजते. हे वाढवण्याची मागणी वारंवार शेतकऱ्यांकडून होत आहे. उदाहरणार्थ कोल्हापूरचा गूळ भौगोलिक मानांकन (Geographical Indication) होऊ शकतो, नंदुरबारची नवापूर देशी तूरडाळ, वायगावची हळद, वेंगुर्ली सांगलीचा बेदाणा, नागपुरची संत्री असे कृषि उत्पादने शोधून भौगोलिक मानांकन (Geographical Indication) करून शेतकऱ्यांना जादा दर मिळवून देण्याच्या दृष्टीने राज्यशासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१०६) " राज्यात फळ शेतीला मोठ्या प्रमाणात वाव आहे, नागपूरची संत्री, बीडची सिताफळे, देवगडचा हापूस आंबा या फळांचा गर घेऊन त्याची पावडर बनविणारी 'उष्मायन केंद्र' (Incubation

Centers) तरुणांच्या हाताला काम देणारी ठरू शकतात, बेबी फूड म्हणून जगात त्याला मागणी मिळू शकेल. २०१९ च्या अर्थसंकल्पामध्ये केंद्रीय अर्थमंत्री यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उष्मायन केंद्र (Incubation Centers) शेती व्यवसायाला पूरक ठरतील असे संकेत देऊन अर्थसंकल्पामध्ये त्याचा समावेश केला आहे त्यामुळे कृषि विद्यापीठात हा अभ्यासक्रम राबवावा व उष्मायन केंद्रांना (Incubation Centers) चालना द्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१०९) " परकीय मुघल राजवटीच्या खाणाखुणा पुसून महाराष्ट्राच्या जाज्वल्य इतिहासाच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी व राज्याची अस्मिता जपण्यासाठी औरंगाबाद या शहराचे "संभाजीनगर" असे नामांतर करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. गोपिचंद पडळकर वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ११०**

(११०) " परकीय मुघल राजवटीच्या खाणाखुणा पुसून महाराष्ट्राच्या जाज्वल्य इतिहासाच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी व राज्याची अस्मिता जपण्यासाठी औरंगाबाद या शहराचे "संभाजीनगर" असे नामांतर करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**तेवीस** : सर्वसाधारण सार्वजनिक हितसंबंधाच्या बाबी

**चोवीस** : सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली कागदपत्रे (यादी स्वतंत्रपणे वितरीत करण्यात आली आहे.)

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २८ फेब्रुवारी २०२२.

**राजेन्द्र ग. भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई